

नाशिक : के. के. वाघ अभियांत्रिकीच्या नोकरीची संधी मिळालेल्या विद्यार्थ्यांसह मान्यवर.

# वाघ अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना नोकरी

## ट्रेनिंग अॅन्ड प्लेसमेंट सेलमार्फत विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस ड्राईव्ह

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. ११ : के. के. वाघ शिक्षण संस्था संचालित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अॅन्ड प्लेसमेंट सेलमार्फत कॉम्प्युटर, आयटी, कॉम्प्युटर सायन्स अॅन्ड डिझाईन आणि आर्टिफिशिअल इंटेलिजन्स अॅन्ड डेटा सायन्स या विभागातील विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले होते. यात पन्नासहून अधिक नामांकित मल्टिनॅशनल उद्योगसमूहांनी सहभाग घेतला. यात १८९ विद्यार्थ्यांना नोकरीची संधी प्राप्त झाली आहे.

अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या १८९ विद्यार्थ्यांपैकी ७३ मुली व ११६ मुले आहेत. नोकरी मिळालेल्या विद्यार्थ्यांना सरासरी ४.८० लाख रुपयांचे वार्षिक पॅकेज प्राप्त झालेले आहेत. या उद्योग समूहामध्ये आयटी इंडस्ट्रीज, कोअर इंडस्ट्रीज आणि सर्व्हिस इंडस्ट्रीजचा समावेश आहे. तसेच नेटविन्स, टीसीएस आणि जोश सॉफ्टवेअर यांसारख्या कंपन्यांचा समावेश आहे.

ॲप्टिट्यूड टेस्ट, ग्रुप डिस्कशन, टेक्निकल इंटरव्ह्यू आणि व्यक्तिगत मुलाखत, अशा फेरींमधून विद्यार्थ्यांची निवड केली गेली. त्यापैकी काही कंपन्यांचे निकाल येणे बाकी असल्याची माहिती ट्रेनिग अॅन्ड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी दिली.

महाविद्यालयातील आठ विद्यार्थ्यांना दुबई येथील कंपनीमध्ये एक महिन्याची इंटर्नशिपची संधी मिळालेली आहे. त्यांना इंटर्नशिपचे मानधन मिळणार असल्याची माहिती प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी दिली.समीर वाघ, अजिंक्य वाघ, प्रा. के. एस. बंदी, डॉ. के. एन. नांदूरकर आदींनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

**Sakal 12-06-2025**